# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४(१९९४चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, १९९६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग**

डॉ. अनिता लोंखडे
(संचालक)
मो.नं.९४२०५११५६०

एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५
दुरध्वनी क्र.०७१३२–२२३१०९
Email:-directorsportsgondwanauni@gmail.com


जा.क्र./गोंवीग/क्रीशाशिवि/९७४/२०१९

दिनांक ३१ /०७ /२०१९

## ( अति महत्वाचे)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

**विषय**:– महाविद्यालयातील '' **शारिरीक शिक्षण प्राध्यापकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी** '' म्हणून नियुक्त न करण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना कार्यपुस्तिका – २००६ मधील तरतुदीअंतर्गत '' **शारिरीक शिक्षकांची राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**'' म्हणून निवड करू नये असे स्पष्टपणे नमुद आहे. तथापी अनेक महाविद्यालयांमध्ये शारिरीक शिक्षण संचालकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त केल्या जाते असे निदर्शनास येत आहे.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे या योजनेतील नियमीत व विशेष कार्यक्रमांच्या जबाबदारी असते. त्यामुळे महाविद्यालयातील नियमीत शारिरीक शिक्षकाकडे उक्त जबाबदारी सोपवल्यास शारिरीक शिक्षण वर्ग, क्रीडा स्पर्धाचे आयोजन, व आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धासाठी संघ व्यवस्थापक म्हणून क्रीडा व शारिरिक शिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या महत्वाच्या व जबाबदारीच्या कामांमध्ये सतत अडचणी निर्माण होतात. करीता विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या शारिरिक शिक्षण व क्रिडा विभागातील कामांमध्ये सुसुत्रता व योग्य नियोजनासाठी आपल्या महाविद्यालयातील शारिरिक शिक्षण शिक्षकांना रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त करु नये.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

GONDWANA UNIVERSITY GADCHIROLI (M.S.) PHYSICAL EDUC DEPARTMEN

(डॉ.अनिता लोखंडे)
संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.